कुसुमाग्रज प्रतिष्ठान

# ‘जनस्थान’ पुरस्कार निवडीचे निकष आणि नियम

१. आपण एकूण तीन नावे पसंतीक्रमानुसार सुचवावयाची आहेत. सूचकाने स्वतःचे नाव सुचवू नये.

२. या पुरस्कारासाठी विद्यमान लेखकाच्या केवळ सर्जनशील साहित्याचाच विचार केला जाईल.

३. साहित्यिकांची नावे सुचविताना त्यांची सकस लेखन निर्मिती, एकूण मराठी साहित्यातील त्यांचे स्थान आणि त्यांच्या लेखनाचा समकालीन मराठी वाङ्मय प्रवाहावर पडलेला प्रभाव असा समग्र विचार अपेक्षित आहे.

४. मराठीत लेखन करणाऱ्या, भारतात किंवा भारताबाहेरील कोणत्याही देशात वास्तव्य करणाऱ्या लेखकाचे नाव पुरस्कारासाठी ग्राह्य धरले जाईल.

५. या शिफारसपत्रकातील ‘आपली भूमिका’ हा रकाना भरणे बंधनकारक नाही.

६. पुरस्काराच्या शिफारसीसंबंधी सर्व पत्रव्यवहार गोपनीय आहे हे कृपया लक्षात घ्यावे.